दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# छत्रपती शिवाजी महाविद्यालयात सायबर सेक्युरिटी कार्यशाळा

**जनसत्य, प्रतिनिधी**

**कुन्हाळी :** वाढते सायबर गुन्हे आटोक्यात आणण्यासाठी सायबर सिक्युरिटी चे ज्ञान असणे प्रत्येकालाच आवश्यक झाले आहे. याचा विचार करून श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सेक्युरिटी संदर्भात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

आधुनिक माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये मानवी जीवन सुलभ झाले असले तरी त्यामुळे अडचणींमध्ये वाढ सुद्धा मोठ्या प्रमाणात झाली आहे. बँकिंग फ्रॉड, सेक्स्टर्शन, मुलींना व महिलांना होणारा नाहक त्रास आदी बाबतीत जागरूकता निर्माण करण्यासाठी क्वीक हिल फौंडेशन व श्री छत्रपती शिवाजी कनिष्ठ म हाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सायबर सेक्युरिटी या विषयावर विद्यार्थ्यांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कु प्रतीक्षा रमेश पांगे यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्नॅपचॅट, इंस्टाग्राम अशा अँप वर नकळत पणे होणाऱ्या चुका आणि त्यामुळे होणारा मनस्ताप, बँकिंग फ्रॉडमुळे होणारे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना अनेक युक्त्या सांगितल्या. समाज माध्यम ाचा कमी, योग्य आणि सुरक्षित वापर या संदर्भानेही त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सर्व उपस्थितांना सायबर सेक्यूरिटी ची शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पी. ए. पिटले, उपप्राचार्य प्रा जी. एस. मोरे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, प्रा. व्ही.व्ही निचत, प्रा. बी. आर. लोकरे व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.